श्रीमद् भागवत का यह सार
भगवद् भक्ति ही आधार

# श्रीमद्भागवत रसिक कुटुंब

## UG-11.6- प्रथम सोपान



स्व धाम प्रस्थान को देखो हो रहे श्री कृष्ण तैयार।
उद्धृत किए उद्धव समक्ष अद्भुत अनमोल उद्गार।।

**नारायणं(न्) नमस्कृत्य, नरं(ञ्) चैव नरोत्तमम्।**
**देवीं(म्) सरस्वतीं(वँ) व्यासं(न्), ततो जयमुदीरयेत्**

**नामसङ्कीर्तनं(यँ) यस्य, सर्वपापप्रणाशनम्।**
**प्रणामो दुःखशमनस्, तं(न्) नमामि हरिं(म्) परम्**

**श्रीमद्भागवतमहापुराणम्**

**एकादशः स्कंधः**

**॥ अथ षष्ठोऽध्यायः ॥**

**श्रीशुक उवाच**

**अथ ब्रह्माऽऽत्मजैर्देवैः(फ्), प्रजेशैरावृतोऽभ्यगात्।**
**भवश्च भूतभव्येशो, ययौ भूतगणैर्वृतः॥ 1॥**
**इन्द्रो मरुद्भिर्भगवा-नादित्या वसवोऽश्विनौ।**
**ऋभवोऽङ्गिरसो रुद्रा, विश्वे साध्याश्च देवताः॥ 2॥**
**गन्धर्वाप्सरसो नागाः(स्), सिद्धचारणगुह्यकाः।**
**ऋषयः(फ्) पितरश्चैव, सविद्याधरकिन्नराः॥ 3॥**
**द्वारकामुपसं(ञ्)जग्मुः(स्), सर्वे कृष्णदिदृक्षवः।**

वपुषा येन भगवान्, नरलोकमनोरमः।

यशो वितेने लोकेषु, सर्वलोकमलापहम्॥ 4॥

श्री शुक म्हणतात-एकदा द्वारकेत आपले पुत्र सन इत्यादी,देव आणि प्रजापतीसह ब्रह्मदेव,भूत घनांसह सर्वेश्वर महादेव, मरुद्गणांसह देवराज इंद्र, बारा आदित्य, आठ वसू, अश्विनी कुमार, ऋभू, अंगिरस, अकरा रुद्र, विश्वेदेव, साध्यगण, गंधर्व, अप्सरा, नाग, सिद्ध, चारण, गुह्यक, ऋषी, पितर, विद्याधर , किन्नर इत्यादी देवगण, मनुष्यासारखा मनोहर वेषधारण करून ज्यांनी आपल्या श्रीविग्रहाने तिन्ही लोकांमध्ये सर्व लोकांचे पाप-ताप नाही से करणारी कीर्ती पसरविली, त्या श्रीकृष्णांच्या दर्शनासाठी आले .

*तस्यां(वँ) *विभ्राजमानायां(म्), स*मृद्धायां(म्) महर्द्धिभिः।

व्य*चक्षतावि*तृप्ताक्षाः(ख्), *कृष्णम*द्भुतदर्शनम्॥ 5॥

सर्व प्रकारच्या ऐश्वर्याने समृद्ध असलेल्या त्या दैदिप्यमान द्वारकापुरीत दिव्यतेजाने तळपणाऱ्या श्रीकृष्णांचे त्यांनी दर्शन घेतले. त्यांना कितीही पाहिले, तरी त्यांचे नेत्र तृप्त होत नव्हते .

स्वर्गोद्यानोपगैर्माल्यैश्- छाद*यन्तो यदूत्तमम्।

गी*र्भिश्चित्रपदा*र्थाभिस्- *तुष्टुवुर्जगदीश्वरम्॥ 6॥

स्वर्गातील उद्यानातील फुलांचा त्यांनी यदुश्रेष्ठ जगदीश्वरावर वर्षाव केला आणि सुंदर शब्दार्थांनी युक्त अश्या वाणीने ते त्यांची स्तुती करू लागले.

देवा ऊचुः

नताः(स्) स्म ते नाथ पदार*विन्दं(म्),

*बुद्धीन्द्रि*यप्राणमनोवचोभिः।

यच्चिन्त्यतेऽन्तर्हृदि भाव*युक्तैर्-

मु*मुक्षुभिः(ख्) कर्ममयोरुपाशात्॥ 7॥

देव म्हणाले- "हे स्वामी !करमांच्या मोठ्या बंधनातून सुटण्याची इच्छा करणारे मुमुक्षुभक्ती भावाने आपल्या हृदयात ज्यांचे चिंतन करीत असतात ,त्या आपल्या चरण कमलांना आम्ही बुद्धी,इंद्रिये,प्राण ,मन आणि वाणीने आज प्रत्यक्ष नमस्कार करीत आहोत .

त्वं(म्) मायया त्रिगुणयाऽऽत्मनि दुर्विभाव्यं(वँ),

*व्यक्तं(म्) सृ*जस्यवसि *लुम्पसि तद्गु*णस्थः।

नैतैर्भवानजित कर्मभि*रज्यते वै,

यत् स्वे सुखेऽव्यवहितेऽभिरतोऽन*वद्यः॥ 8॥

हे अजित !आपण मायेच्या गुणांमध्ये राहून या अचिंत्य नाम रुपात्मक प्रपंचाची त्रिगुणमय मायेने व्यक्तरूपात आपल्यातच उत्पत्ती ,पालन आणि संहार करता .पण या कर्मांनी आपण लिफ्ट होत नाही

.कारण सर्व दोषांपासून आपण मुक्त आहात आणि कोणत्याही प्रकारचे आवरण नसलेल्या आपल्या अखंड स्वरूप भूत परमानंदामध्ये निमग्न असता .

शुद्धिर्नृणां(न्) न तु तथेड्य दुराशयानां(वँ),

विद्याश्रुताध्ययनदानतपः(ख्)क्रियाभिः।

सत्त्वात्मनामृषभ ते यशसि प्रवृद्ध-

सच्छ्रद्धया श्रवणसम्भृतया यथा स्यात्॥ 9॥

हे स्तुती करण्यायोग्य परमात्म न !ज्या लोकांचे चित्तवृत्ती राग-द्वेषादिकांनी कलुषितझालेली असते,ते उपासना,वेदा ध्ययन,दान,तपश्चर्या,यज्ञ इत्यादी कर्मांनी तशी शुद्ध होत नाही'जशी शुद्धान्तः करणमनुष्यांची आपल्या कीर्तीच्या श्रवणाने वाढलेल्या श्रेष्ठ श्रद्धेने होते .

स्यान्नस्तवाङ्घ्रिरशुभाशयधूमकेतुः(ह),

क्षेमाय यो मुनिभिरार्द्रहृदोह्यमानः।

यः(स्) सात्वतैः(स्) समविभूतय आत्मवद्भिर्-

व्यूहेऽर्चितः(स्) सवनशः(स्) स्वरतिक्रमाय॥ 10॥

यश्चिन्त्यते प्रयतपाणिभिरध्वराग्नौ,

त्रय्या निरुक्तविधिनेश हविर्गृहीत्वा।

अध्यात्मयोग उत योगिभिरात्ममायां(ञ्),

जिज्ञासुभिः(फ्) परमभागवतैः(फ्) परीष्टः॥ 11॥

मोक्ष प्राप्तीसाठी मननशील मुमुक्षु ज्यांना आपल्या प्रेमाने द्रवलेल्या हृदयात ठेवतात' पांचरात्र विधीचे उपासक आपल्यासारख्या ऐश्वर्याच्या प्राप्तीसाठी ज्यांची उपासना करतात, वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न आणि अनिरुद्ध या चतुर्व्युहाच्या ठिकाणी जितेंद्र य भक्त स्वर्गलोकांच्या पलीकडील भगवद्धामाच्या प्राप्तीसाठी त्रिकाळज्यांची पूजा करतात,याज्ञीक लोक तिन्ही वेदांनी सांगितलेल्या विधीने आपल्या पवित्र हातामध्ये हविर्द्रव्य घेऊन ज्यांचे चिंतन करतात, तुमचेच स्वरूप असलेल्या मायेचे स्वरूप जाणून घेऊ इच्छिणारे योगीजन ऱ्हदयाच्या आत ज्यांचे ध्यान करतात आणि श्रेष्ठ भक्तजनांना जे परम इष्ट वाटतात,तेच आपले चरण हे प्रभो! आमच्या सर्व अशुभ वासना भस्म करण्यासाठी अग्निस्वरूप होवोत.

पर्युष्टया तव विभो वनमालयेयं(म्),

सं(म्)स्पर्धिनी भगवती प्रतिपत्निवच्छ्रीः।

यः(स्) सुप्रणीतममुयार्हणमाददन्नो,

भूयात् सदाङ्घ्रिरशुभाशयधूमकेतुः॥ 12॥

हे प्रभो !ही भगवती लक्ष्मी आपल्या वक्षस्थळावरील कोमेजलेल्याही वनमालेचा सवतीप्रमाणे मत्सरकरीत असते .तरीसुद्धा तिची पर्वा न करता भक्तांनी या माळेने केलेल्या पूजेचा जे स्वीकार

करतात ,ते आपले चरण नेहमी आमच्या विषय वाचनांना जाळण्यासाठी अग्नि स्वरूप होवोत .

केतुस्त्रिविक्रमयुतस्त्रिपतत्पताको,

यस्ते भयाभयकरोऽसुरदेवचम्वोः।

स्वर्गाय साधुषु खलेष्वितराय भूमन्,

पादः(फ्) पुनातु भगवन् भजतामघं(न्) नः॥ 13॥

हे भगवान अनंता ! वामन अवतारामध्ये बलीच्या बंधनासाठीज्याने तीन पावले टाकली होती ,जो सत्य लोकांवरील विजयध्वजचवाटत होता .ब्रह्मदेवांनी जो धुतला तेव्हा त्यातून कोसळणाऱ्या गंगेच्या तीन धारा तीन पताकांसारख्या वाटत होत्या ,ज्याला पाहून असूरांची सेना भयभीत आणि देवसेना निर्भय झाली होती ,जो देवांना स्वर्ग देणारा आणि असूरांना पाताळात नेणारा होता ,तो आपला चरण आम्हा भजन करणाऱ्यांचे सगळे पाप धुवून टा को .

नस्योतगाव इव यस्य वशे भवन्ति,

ब्रह्मादयस्तनुभृतो मिथुरर्द्यमानाः।

कालस्य ते प्रकृतिपूरुषयोः(फ्) परस्य,

शं(न्) नस्तनोतु चरणः(फ्) पुरुषोत्तमस्य॥ 14॥

आपापसात भांडून कष्टी होणारे ब्रह्मदेव इत्यादी शरीरधारी,व्यसन घातलेले बैल मालकाच्या ताब्यात असावेत,त्याप्रमाणे ज्याच्या अधीन आहेत,जो काल स्वरूप व प्रकृती पुरुषांच्या पलीकडे असणाऱ्या आपला पुरुषोत्तमाचा चरण आहे 'तो आमचे कल्याण करो .

अस्यासि हेतुरुदयस्थितिसंयमाना-

मव्यक्तजीवमहतामपि कालमाहुः।

सोऽयं(न्) त्रिणाभिरखिलापचये प्रवृत्तः(ख्),

कालो गभीररय उत्तमपूरुषस्त्वम्॥ 15॥

हे प्रभो !या जगाची उत्पत्ती ,किती आणि प्रलय यांचे आपण परमकारण आहात .कारण शास्त्रे म्हणतात की,आपण प्रकृती ,पुरुष आणि महत्तत्व यांचे सुद्धा नियंत्रण करणारे काल आहात .तोच हा हिवाळा ,उन्हाळा आणि पावसाळा या तीन रूपाने युक्त असणाऱ्या संवत्सराच्या रूपाने सर्वांना विनाशाकडे घेऊन जाणारा आहे .तो अतिशय वेगवान काळ म्हणजे आपण पुरुषोत्तम आहात .

त्वत्तः(फ्) पुमान् समधिगम्य यया स्ववीर्यं(न्),

धत्ते महान्तमिव गर्भममोघवीर्यः।

सोऽयं(न्) तयानुगत आत्मन आण्डकोशं(म्),

हैमं(म्) ससर्ज बहिरावरणैरुपेतम्॥ 16॥

हा पुरुष आपल्याकडून शक्ती प्राप्त करून घेऊन अमोघ वीर्य बनतो.आणि नंतर मायेमध्ये विश्वाच्या गर्भ रूप महततत्वाची स्थापना करतो. यानंतर ते महत्तत्व चमकत्व त्रिगुणमय मायेच्या साह्याने पृथ्वी ,जल,तेज ,वायु ,आकाश,अहंकार आणि मन रूपी सात अवरणे असलेल्या सोनेरी ब्रह्मांडाची रचना करते .

**तत्तस्थुषश्च जगतश्च भवानधीशो,**

**यन्माययोत्थगुणविक्रिययोपनीतान्।**

**अर्थां(ञ्)जुषन्नपि हृषीकपते न लिप्तो,**

**येऽन्ये स्वतः(फ्) परिहृतादपि बिभ्यति स्म॥ 17॥**

म्हणून हे ऋषिकेश !आपण सर्व चराचर जगाचे अधीश्वर आहात .याच कारणास्तव मायेच्या गुणांच्या विषमतेमुळे निर्माण होणाऱ्या निरनिराळ्या पदार्थांचा उपभोग घेत असतानाही आपण त्याने लिप्त होत नाही .आपल्या व्यतिरिक्त इतर ,स्वतः त्यांचा त्याग करून सुद्धा त्या विषयांना भीत असता त .

**स्मायावलोकलवदर्शितभावहारि-**

**भ्रूमण्डलप्रहितसौरतमन्त्रशौण्डैः।**

**पत्न्यस्तु षोडशसहस्रमनं(ङ्)गबाणैर्-**

**यस्येन्द्रियं(वँ) विमथितुं(ङ्) करणैर्न विभ्व्यः॥ 18॥**

16 हजारांहून अधिक राहण्या आपल्या मंद हास्ययुक्त नेत्रकटाक्षांनी प्रगट केलेल्या भावामुळे मनोहर दिसणाऱ्या भुवयांच्या इशाऱ्याने प्रेम भाव प्रगट करण्यात निपुण असणारे संमोहक कामबाण आपल्यावर सोडून आणि काम कलांचे प्रदर्शन करूनहीआपले मन जराही विचलित करू शकल्या नाहीत .

**विभ्व्यस्तवामृतकथोदवहास्त्रिलोक्याः(फ्),**

**पादावनेजसरितः(श्) शमलानि हन्तुम्।**

**आनुश्रवं(म्) श्रुतिभिरङ्घ्रिजमङ्गसङ्गैस्-**

**तीर्थद्वयं(म्) शुचिषदस्त उपस्पृशन्ति॥ 19॥**

त्रैलोक्यातीलपापांच्या राशी धुवून टाकण्यासाठी दोन पवित्र नद्या समर्थ आहेत. एक आपल्या अमृतमय लीलांनी भरलेली कथा नदी आणि दुसरी आपले चरण धुतल्यानंतर वाहणाऱ्या पाण्याने भरलेली गंगा नदी !म्हणूनच आश्रम धर्म पाळणारे लोक कानांनी आपल्या कथा नदीमध्ये आणि शरीराने गंगेमध्ये बुडीमारून दोन्ही तीर्थांचे सेवन करतात .

**बादरायणिरुवाच**

**इत्यभिष्टूय विबुधैः(स्), सेशः(श्) शतधृतिर्हरिम्।**

**अभ्यभाषत गोविन्दं(म्), प्रणम्याम्बरमाश्रितः॥ 20॥**

श्री शुक म्हणतात -ब्रह्मदेवांनी, सर्व देव आणि शंकर यांच्यासह अशा प्रकारे भगवंतांची स्तुती केली .नंतर नमस्कार करून आकाशात राहून भगवंतांना ते म्हणाले .

**ब्रह्मोवाच**

**भूमेर्भारावताराय, पुरा विज्ञापितः(फ्) प्रभो।**

**त्वमस्माभिरशेषात्मं(म्)स्-तत्तथैवोपपादितम्॥ 21॥**

ब्रह्मदेव म्हणाले -सर्वात्मानप्रभो !आपण अवतार घेऊन पृथ्वीवरील भार कमी करावा .अशी आम्ही अगोदर प्रार्थना केली होती .ते काम आपण चांगल्या तऱ्हेने पूर्ण केले आहे .

**धर्मश्च स्थापितः(स्) सत्सु, सत्यसन्धेषु वै त्वया।**

**कीर्तिश्च दिक्षु विक्षिप्ता, सर्वलोकमलापहा॥ 22॥**

सत्यपरायण साधू पुरुषांच्या ठिकाणी आपण धर्माची स्थापना सुद्धा केलीत आणि दाही दिशांना लोकांचे दोष दूर करणारी आपली कीर्ती पसरवली.

**अवतीर्य यदोर्वं(म्)शे, बिभ्रद् रूपमनुत्तमम्।**

**कर्माण्युद्दामवृत्तानि, हिताय जगतोऽकृथाः॥ 23॥**

आपण हे सर्वोत्तम रूप धारण करून यदुवंशात अवतार घेतला आणि जगाच्या हितासाठी औदार्य आणि पराक्रमाने परिपूर्ण अशा अनेक लीला केल्या .

**यानि ते चरितानीश, मनुष्याः(स्) साधवः(ख्) कलौ।**

**श्रृण्वन्तः(ख्) कीर्तयन्तश्च, तरिष्यन्त्यञ्जसा तमः॥ 24॥**

हे प्रभो !जी सज्जन माणसे कलियुगात आपल्या या लीलांचे श्रवण कीर्तन करतील ती या अज्ञानरूप अंधकाराच्या पलीकडे सहज निघून जातील .

**यदुवं(म्)शेऽवतीर्णस्य, भवतः(फ्) पुरुषोत्तम।**

**शरच्छतं(वँ) व्यतीयाय, पं(ञ्)चविं(म्)शाधिकं(म्) प्रभो॥ 25॥**

हे पुरुषोत्तम प्रभो !आपण यदुवंशात अवतार घेतल्याला 125 वर्षे झाली आहेत .

**नाधुना तेऽखिलाधार, देवकार्यावशेषितम्।**

**कुलं(ञ्) च विप्रशापेन, नष्टप्रायमभूदिदम्॥ 26॥**

हे सर्वाधार !आता देवांचे कोणतेही कार्य शिल्लक राहिलेले नाही .आपले हे कुळ सुद्धा ब्राह्मणांच्या शापामुळे जवळजवळ नष्ट झालेलेच आहे .

**ततः(स्) स्वधाम परमं(वँ), विशस्व यदि मन्यसे।**

**सलोकाँल्लोकपालान् नः(फ्), पाहि वैकुण्ठ किं(ङ्)करान्॥ 27॥**

म्हणून हे वैकुंठ नाथ !आपणास योग्य वाटत असेल तर आपण आपल्या परमधामात परत यावे आणि आपले सेवक असलेल्या आम्हा लोकपालांचा तसेच आमच्या लोकांचा सांभाळ करावा .

**श्रीभगवानुवाच**

**अवधारितमेतन्मे, यदात्थ विबुधेश्वर।**

**कृतं(वँ) वः(ख्) कार्यमखिलं(म्), भूमेर्भारोऽवतारितः॥ 28॥**

श्रीकृष्ण म्हणाले -हे ब्रह्मदेवा !तू म्हणालास ,तसेच मी अगोदरच ठरवले आहे .तुमचे सर्व कामे पूर्ण केले असून पृथ्वीवरील भार उतरविला आहे .

**तदिदं(यँ) यादवकुलं(वँ), वीर्यशौर्यश्रियोद्धतम्।**

**लोकं(ञ्) जिघृक्षद् रुद्धं(म्) मे, वेलयेव महार्णवः॥ 29॥**

परंतु हे यादव कुळ पराक्रम ,शौर्य आणि संपत्तीने गुणवत्त होऊ लागले आहे .हे सर्व पृथ्वी गिळून टाकील .किनारा समुद्राला रोखून धरतो,त्याप्रमाणे मी यांना रोखून धरले आहे .

**यद्यसं(म्)हृत्य दृप्तानां(यँ), यदूनां(वँ) विपुलं(ङ्) कुलम्।**

**गन्तास्म्यनेन लोकोऽय-मुद्वेलेन विनङ्क्ष्यति॥ 30॥**

या उच्छृंखलयदुंचा हा विशाल वंश नष्ट न करताच मी जर निघून गेलो तर हा मर्यादेचे उल्लंघन करून या जगाचा संहार करील .

**इदानीं(न्) नाश आरब्धः(ख्), कुलस्य द्विजशापतः।**

**यास्यामि भवनं(म्) ब्रह्मन् -नेतदन्ते तवानघ॥ 31॥**

हे पुण्यशील ब्रह्मदेवा !ब्राह्मणांच्या शापामुळे आता या वंशाचा नाश होण्यास सुरुवात झाली आहे .याचा अंत झाला की मी स्वतःला परत येईन

**श्रीशुक उवाच**

**इत्युक्तो लोकनाथेन, स्वयम्भूः(फ्) प्रणिपत्य तम्।**

**सह देवगणैर्देवः(स्), स्वधाम समपद्यत॥ 32॥**

श्री शु क म्हणतात. -अखिल लोकाधिपती श्रीकृष्णांनी असे सांगितल्यावर ब्रह्मदेवाने त्यांना नमस्कार केला आणि देवतांसह ते आपल्या धामाकडे निघून गेले .

**अथ तस्यां(म्) महोत्पातान्, द्वारवत्यां(म्) समुत्थितान्।**

**विलोक्य भगवानाह, यदुवृद्धान् समागतान्॥ 33॥**

नंतर त्या द्वारकापुरी मध्ये मोठमोठे अपशकुन होऊ लागले. ते पाहून यदुवंशातील ज्येष्ठ श्रेष्ठ श्रीकृष्णांकडे आले .तेव्हा त्यांनी त्यांना असे सांगितले .

**श्रीभगवानुवाच**

एते वै सुमहोत्पाता, व्युत्तिष्ठन्तीह सर्वतः।

शापश्च नः(ख्) कुलस्यासीद्, ब्राह्मणेभ्यो दुरत्ययः॥ 34॥

न वस्तव्यमिहास्माभिर्-जिजीविषुभिरार्यकाः।

प्रभासं(म्) सुमहत्पुण्यं(यँ), यास्यामोऽद्यैव मा चिरम्॥ 35॥

श्रीकृष्ण म्हणाले -येथे जिकडे तिकडे आजकाल मोठमोठे अपशकून होत आहेत .शिवाय ब्राह्मणांनी आपल्या वंशाला दिलेला शाप टाळणे कठीण आहे .म्हणून सज्जन हो !आपल्याला जर जगायचे असेल तर आपण येथे राहू नये .म्हणून आता उशीर करू नका .आपण आजच परमपवित्र अशा प्रभासक्षेत्री जाऊ .

यत्र स्नात्वा दक्षशापाद्, गृहीतो यक्ष्मणोडुराट्।

विमुक्तः(ख्) किल्बिषात् सद्यो, भेजे भूयः(ख्) कलोदयम्॥ 36॥

दक्ष प्रजापतींच्या शापाने जेव्हा चंद्राला क्षयरोगाने ग्रासले ,त्यावेळी त्याने तेथे जाऊन स्नान केले आणि त्याच क्षणी त्या पापजन्य रोगातून त्याची सुटका झाली आणि पुन्हा त्याच्या कला वाढू लागल्या .

वयं(ञ्) च तस्मिन्नाप्लुत्य, तर्पयित्वा पितॄन् सुरान्।

भोजयित्वोशिजो विप्रान्, नानागुणवतान्धसा॥ 37॥

तेषु दानानि पात्रेषु, श्रद्धयोप्त्वा महान्ति वै।

वृजिनानि तरिष्यामो, दानैर्नौभिरिवार्णवम्॥ 38॥

आपण सुद्धा तेथे जाऊन स्नान करू .देवता आणि पितरांचे तर्पण करू .त्याचबरोबर अनेक उत्तम उत्तम पक्का ने तयार करून श्रेष्ठ ब्राह्मणांना भोजन घालू .तेथे आपण सतपात्र ब्राह्मणांना पूर्ण श्रद्धेने मोठी दान दक्षिणा देऊ आणि अशा प्रकारे नवकेने समुद्र पार करावा ,त्याप्रमाणे दानांनीआपण संकटे पार करून जाऊ .

श्रीशुक उवाच

एवं(म्) भगवताऽऽदिष्टा, यादवाः(ख्) कुलनन्दन।

गन्तुं(ङ्) कृतधियस्तीर्थं(म्), स्यन्दनान् समयूयुजन्॥ 39॥

श्री शुक म्हणतात -हे कुल नंदना !भगवान श्रीकृष्णांनी जेव्हा अशी आज्ञा केली,तेव्हा यादवांनी प्रभासकक्षेत्री जाण्याचे ठरवून रथ सज्ज केले .

तन्निरीक्ष्योद्धवो राजन्, श्रुत्वा भगवतोदितम्।

दृष्ट्वारिष्टानि घोराणि, नित्यं(ङ्) कृष्णमनुव्रतः॥ 40॥

विविक्त उपसं(ङ्)गम्य, जगतामीश्वरेश्वरम्।

प्रणम्य शिरिसा पादौ, प्रां(ञ्)जलिस्तमभाषत॥ 41॥

परीक्षेत !उद्धव श्रीकृष्णांचा एकांत भक्त होता जेव्हा त्याने ती तयारी पाहिली,भगवंतांची आज्ञा ऐकली आणि अतिशय घोर अपशकुन झाल्याचेही पाहिले,तेव्हा तो जगाच्या अधिपतींचे ईश्वर असणाऱ्या श्रीकृष्णांकडे एकांतात गेला,त्यांच्या चरणांवर डोके टेकवून त्यांना त्याने नमस्कार केला आणि हात जोडून तो त्यांना प्रार्थना करू लागला .

उद्धव उवाच

देवदेवेश योगेश, पुण्यश्रवणकीर्तन।

सं(म्)हृत्यैतत् कुलं(न्) नूनं(ल्ँ), लोकं(म्) सन्त्यक्ष्यते भवान्।

विप्रशापं(म्) समर्थोऽपि, प्रत्यहन्न यदीश्वरः॥ 42॥

उद्धव म्हणाला -हे योगेश्वर देवाधिदेव !आपल्या लीलांचे श्रवण कीर्तन पुण्यकारक आहे .आपण परमेश्वर असल्यामुळे शक्य असूनही आपण ब्राह्मणांचा शाप निष्प्रभ केला नाही .यावरून मला असे वाटते की,आता आपण यदुवंशाचा संसार करून या लोकांचा त्याग करणार ,हे निश्चित !

नाहं(न्) तवाङ्घ्रिकमलं(ङ्), क्षणार्धमपि केशव।

त्यक्तुं(म्) समुत्सहे नाथ, स्वधाम नय मामपि॥ 43॥

परंतु हे केशवा !आपल्या चरण कमलांना मी अर्ध्या क्षणासाठी सुद्धा सोडू शकत नाही .हे स्वामी !आपण मलाही आपल्या धामाला घेऊन चला .

तव विक्रीडितं(ङ्) कृष्ण, नृणां(म्) परममङ्गलम्।

कर्णपीयूषमास्वाद्य, त्यजन्त्यन्यस्पृहां(ञ्) जनः॥ 44॥

शय्यासनाटनस्थानस्-नानक्रीडाशनादिषु।

कथं(न्) त्वां(म्) प्रियमात्मानं(वँ), वयं(म्) भक्तास्त्यजेमहि॥ 45॥

हे कृष्णा !आपली लीला माणसांसाठी परममंगल आणि कानांना अमृत स्वरूप आहे .ज्याला एक वेळ तिची गोडी लागली,त्याच्या मनात नंतर दुसऱ्या कोणत्याही वस्तूची इच्छाच शिल्लक राहत नाही . प्रभो !आम्ही तर झोपणे,बसणे ,हिंडणे ,फिरणे , स्नान ,खेळ,भोजन इत्यादी सर्व प्रसंगात आपल्याबरोबरच असतो .आपण आमचे प्रियतमा आत्मा आहात .आम्ही आपल्याला कसे सोडू ?

त्वयोपभुक्तस्रग्गन्ध-वासोऽलङ्कारचर्चिताः।

उच्छिष्टभोजिनो दासास्-तव मायां(ञ्) जयेमहि॥ 46॥

आपण वापरलेली माळ,चंदन ,वस्त्रे ,अलंकार इत्यादी वस्तू प्रसाद म्हणून घेणारे आम्ही आपले सेवक आहोत .म्हणून आपल्या मायेवर आम्ही अवश्य विजय मिळवू शकू .

वातरशना य ऋषयः(श्), श्रमणा ऊर्ध्वमन्थिनः।

ब्रह्माख्यं(न्) धाम ते यान्ति, शान्ताः(स्) सं(न्)न्यासिनोऽमलाः॥ 47॥

अनेक ऋषी दिगंबर राहून आणि जन्मभर नैष्ठिक ब्रह्मचर्याचे पालन करून अध्यात्म विद्या प्राप्त करून घेण्यासाठी अतिशय परिश्रम करतात .अशा त्या संन्याशांचे हृदय निर्मळ होते ,तेव्हा कुठे ते शांत होऊन आपले ब्रह्म नावाचे स्थान प्राप्त करून घेतात .

वयं(न्) त्विह महायोगिन्, भ्रमन्तः(ख्) कर्मवर्त्मसु।

त्वद्वार्तया तरिष्यामस्-तावकैर्दुस्तरं(न्) तमः॥ 48॥

स्मरन्तः(ख्) कीर्तयन्तस्ते, कृतानि गदितानि च।

गत्युत्स्मितेक्षणक्ष्वेलि, यन्नृलोकविडम्बनम्॥ 49॥

हे महायोगेश्वर !आम्ही तर कर्ममार्गातच भटकणारे आहोत .परंतु आम्ही आपल्या भक्तजनांबरोबर आपले गुण आणि लीलांची चर्चा करून तसेच माणसासारख्या कृती करीत आपण जे काही केलेत ,किंवा सांगितलेत,त्यांचे स्मरण कीर्तनकरीत राहू .त्याचप्रमाणे आपले चालणे -बोलणे ,हास्ययुक्त पहाणे आणि थट्टा -विनोद यांच्या आठवणीत तल्लीन राहू .केवळ एवढ्यानेच आम्ही आपली दुस्तर माया पार करू .

श्रीशुक उवाच

एवं(वँ) विज्ञापितो राजन्, भगवान् देवकीसुतः।

एकान्तिनं(म्) प्रियं(म्) भृत्य-मुद्धवं(म्) समभाषत॥ 50॥

श्री शुकम्हणतात -परीक्षिता ! देवकी नंदन भगवान श्रीकृष्णांना जेव्हा उद्धवांनी अशी प्रार्थना केली ,तेव्हा ते आपल्या अनन्यप्रेमी सखावसेवक असलेल्या उद्धवाला म्हणाले .

इति श्रीमद्भागवते महापुराणे पारमहं(म्)स्यां(म्)

सं(म्)हितायामेकादशस्कन्धे षष्ठोऽध्यायः।।

ॐ पूर्णमदः(फ्) पूर्णमिदं(म्)पूर्णात्पूर्णमुदच्यते

पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते।।

ॐ शान्तिः(श्)शान्तिः(श्)शान्तिः।।